# नियमित दिवाणी दावा क्र. ४२६/२०१३ मधील निशाणी ४४ वरील आदेश
## (मनिषा गुरव विरुध्द उत्तम गुरव वगैरे ३)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांना गट नंबर ८९३ मधील ऊसाचे बील जप्त होवून न्यायालयात जमा करुन घेणेत यावे असा आदेश श्री दत्त इंडीया प्रायव्हेट लिमिटेड यांना करणेसाठी दाखल केलेला आहे. त्यास त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांनी निशाणी ५७ वर तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी निशाणी ५६ वर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

२. वादीचे कथनाप्रमाणे, प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप व डिक्लेरेशनकरीता दाखल केलेला आहे. वादी–प्रतिवादी यांचे वडील उत्तम दत्तात्रय गुरव हे मयत झालेले आहेत. त्यांच्या पश्चात दावा मिळकत वारसा हक्काने वादी यांना मिळणेस ते पात्र आहेत. परंतु वादीचा भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र. २ याने संपूर्ण मिळकत गिळंकृत करणेच्या उद्देशाने बाबासाहेब अशोक वरणे यांचे नावावर दावा कलम १ अ मधील मिळकतीतील ऊस श्री दत्त इंडीया प्रा. लि. या कारखान्यास दि. १५/०३/२०१८ रोजी पाठविलेला आहे. ते बिल जप्त होवून कोर्टात जमा होणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादी क्र. २ यांच्या म्हणण्यातील कथनाप्रमाणे, वाद मिळकतीच्या सातबारा पत्रकी गट नंबर ८९३ वर देवस्थान इनाम वर्ग ३ असा उल्लेख केलेला आहे व त्यावर श्री चौंडेश्वरी देवी देवस्थान असा उल्लेख आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे श्री चौंडेश्वरी देवी या देवस्थानची पुजा–अर्चा प्रतिवादी क्र. २ हे करीत असतात. तसेच वाद मिळकतीतून येणारे उत्पन्न हे देवस्थानच्या देखभालीसाठी व स्वतःच्या चरितार्थासाठी वापरतात. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

४. त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांच्या म्हणण्यातील कथनाप्रमाणे, सदरची मिळकत देवस्थान इनाम वर्ग ३ ची असून त्यामध्ये ति–हाईत इसम यांनी र.रु. २ लाख इतके खर्च करुन विहीरीचे उत्खनन केलेले आहे. तसेच वाद मिळकत पिकाऊ बनवण्यासाठी ति–हाईत इसम यांनी जमीनीचे सपाटीकरण केलेले आहे व त्यामध्ये लाग–लागवड, बी–बियाणे यासाठी जवळपास रु.१ लाख ५० हजार इतका खर्च

केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे, ते वाद मिळकतीमधून येणारे उत्पन्न देवस्थानच्या देखभालीसाठी व स्वतःच्या चरितार्थासाठी वापरतात. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

५. अर्ज व म्हणणे यातील कथनांचे बारकाईने अवलोकन केले. तसेच कागदपत्रांची पाहणी केली. त्यावरुन असे दिसून येते की, त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांचे नावे गट नंबर ८९३ मधील ऊस श्री दत्त इंडीया प्रा. लि. या कारखान्यास गेलेला आहे. परंतु त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे अथवा प्रतिवादी क्र. २ यांनी असा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही ज्यावरुन त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांना त्या जमीनीमध्ये ऊस पिक करणेचा अथवा तो ऊस गाळपास पाठविण्याचा हक्क आहे असे दिसून येईल. तसेच निशाणी ५५ व ५७ मधील म्हणण्यामध्ये देखील त्यांना तसा हक्क कोठून येतो हे स्पष्ट केलेले नाही. परंतु वाद मिळकतीचा सातबारा पाहिला असता त्यावर वादी–प्रतिवादी यांची नावे दिसून येतात. प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांना कशा प्रकारे ऊस पिक गाळपास पाठविण्याचा हक्क दिला, हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे केवळ विरोध दर्शवून वादीचा अर्ज फेटाळून लावण्यास त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे व प्रतिवादी क्र. २ हे यशस्वी ठरु शकत नाहीत. त्याचप्रमाणे सातबारा उतारा पाहिला असता प्रथमदर्शनी वादीला गट नंबर ८९३ मध्ये हक्क दिसून येतो. त्यामुळे नक्कीच त्या गट नंबरमधील ऊस बिल जप्त करणेबाबत व ते न्यायालयात जमा करुन घेणेबाबत दाद वादी मागू शकतात. तरी, आदेश खालीलप्रमाणे –

## **आ दे श**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांनी गट नंबर ८९३ (मौजे आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली येथील) मधील ऊसाचे बिल श्रीदत्त इंडीया प्रा. लि. या कारखान्याकडून परस्पर स्वीकारु नये.

३. श्री दत्त इंडीया प्रा. लि. यांना असा आदेश करणेत येतो की, त्यांनी गट नंबर ८९३ (मौजे आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली येथील) मधील श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांचे नावे गाळप झालेल्या ऊसाचे बिल न्यायालयात जमा करावे.

४. येणेप्रमाणे श्री. दत्त इंडिया प्रा. लि. यांना नोटीस काढण्यात यावी.

सही/---

**इस्लामपूर.** **(पी.जी.इनामदार)**

**दि. ०५/०५/२०१८** **३रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, इस्लामपूर**